आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२७ जुलै २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत नीती आयोगाची बैठक सुरू/ विकसित भारताच्या ध्येय धोरणांच्या मसुद्याची होणार चर्चा

- भारताचा परदेशी चलन साठा ६७१ अब्ज डॉलर्स च्या उच्चांकी पातळीवर

- जम्मू आणि काश्मीरच्या कुपवाडा इथं झालेल्या चकमकीत एक पाकिस्तानी नागरिक ठार, सुरक्षा दलाचे पाच जवान जखमी

- पॅरिस ऑलिंपिकची दिमाखदार सोहळ्यानं सुरूवात

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेटमध्ये भारत आणि श्रीलंके दरम्यानच्या तीन सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना आज होणार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत नीती आयोगाची ९ वी बैठक सुरू आहे. या वर्षीच्या बैठकीचं घोषवाक्य 'विकसित भारत २०४७' असून त्याच्या ध्येय धोरणांच्या मसुद्यासाठी या बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्र आणि राज्य सरकारांमधील समन्वयाच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी विभागातला जीवनस्तर उंचावण्यासाठी धोरण तयार करण्याचं लक्ष्य या बैठकीत ठेवण्यात आलं आहे.

या बैठकीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सर्व राज्यांचे मुख्यमंत्री त्याचप्रमाणे केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल, विशेष निमंत्रित आणि

नीती आयोगाचे उपाध्यक्ष तसेच सदस्य उपस्थित आहेत. दरम्यान नीती आयोगाच्या बैठकीत राज्यांमध्ये भेदभाव केला जात असून आपल्याला बोलायला दिलं नाही, असा आरोप पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केला आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०२४ च्या अर्थसंकल्पाची रूपरेषा नमो ॲपवर सामायिक केली आहे. या रुपरेषेत रोजगार निर्मिती आणि कौशल्या संबंधित विविध सरकारी घोषणा, योजना आणि नवीन उपक्रमांची सोप्या पद्धतीनं माहिती देण्यात आली आहे. रोजगाराला प्रोत्साहन देणार्या  योजनांसह नवीन रोजगार निर्माण करणं, एक मजबूत आणि कार्यक्षम मनुष्यबळ तयार करणं आणि रोजगार निर्मात्यांना सक्षम करणं हे या अर्थसंकल्पाचं उद्दिष्ट असल्याचं मोदी यांनी समाजमाध्यमावरल्या एका संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता मन की बात या मासिक कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११२वा, तर मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा प्रधानमंत्रीपदाची सूत्रं हाती घेतल्यानंतरचा दुसरा भाग आहे. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व केंद्रांवरून, तसंच एआयआर न्यूज हे संकेतस्थळ आणि न्यूज ऑन एआयआर या मोबाइल ॲपवरून थेट प्रक्षेपित केला जाईल. एआयआर न्यूज, डीडी न्यूज, प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनल्सवरूनही कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण आपण ऐकू शकाल.

**<><><><><>**

माजी राष्ट्रपती आणि ख्यातनाम शास्त्रज्ञ डॉ. एपीजे अबद्ल कलाम यांची आज ९ वी पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त त्यांना देशभर आदरांजली वाहण्यात येत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी कलाम यांना समाजमाध्यमाद्वारे आंदरांजली वाहिली. कलाम यांचं आयुष्य हा कठोर परिश्रम, साधेपणा आणि संवेदनशीलता यांचा संगम होता, त्यांच्या आयुष्यानं देशातल्या तरुणांना प्रेरणा दिली, असं शाह आपल्या संदेशात म्हणाले.

**<><><><><>**

रिझर्व्ह बँकेनं प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, १९ जुलैला संपलेल्या सलग तिसऱ्या आठवड्यात परदेशी चलन गंगाजळीत भर पडल्यानं भारताचा परदेशी चलन साठा ६७१ अब्ज डॉलर्स या आजवरच्या उच्चांकी पातळीवर पोहोचला आहे. त्यापूर्वीच्या सलग दोन आठवड्यांमध्ये मिळून परदेशी चलन गंगाजळीत जवळपास १५ अब्ज डॉलर्सनी वाढ झाली होती. २०२३-२४ या आर्थिक वर्षात भारताची चालू खात्यातली तूट सकल देशांतर्गत उत्पन्न अर्थात जीडीपीच्या ७ टक्के म्हणजेच २३ पूर्णांक २ दशांश अब्ज डॉलर्सनी कमी झाली होती. ही आकडेवारी देशाची परदेशातील व्यापाराची स्थिती चांगली असल्याचं द्योतक आहे.

**<><><><><>**

भारतानं ए डी पी सी अर्थात आशियाई आपत्ती सुसज्जता केंद्राचं अध्यक्षपद स्वीकारलं आहे.  ‘ए डी पी सी’ ही आशियाई आणि पॅसिफिक क्षेत्रात आपत्ती निवारण आणि पर्यावरण लवचिकता याबाबत सहकार्य आणि अंमलबजावणी करणारी स्वायत्त आंतरराष्ट्रीय संघटना असल्याचं केंद्रीय गृह मंत्रालयानं सांगितलं आहे. भारतासह बांग्लादेश, कंबोडिया, चीन, नेपाळ, पाकिस्तान, फिलिपाईन्स, श्रीलंका आणि थायलंड हे शेजारी देश ए डी पी सी चे संस्थापक सदस्य देश आहेत.

जागतिक तसंच प्रादेशिक स्तरावर आपत्ती जोखीम नियंत्रण राखण्यात भारताची भूमिका महत्वाची राहिल्याचं केंद्रीय गृह मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

जम्मू आणि काश्मीरच्या कुपवाडा जिल्ह्यात मच्चाल सेक्टरमधल्या  कामकारी भागात आज सकाळी सुरू झालेल्या चकमकीत एका पाकिस्तानी नागरिकाला ठार करण्यात आलं असून या चकमकीत सुरक्षा दलाचे पाच जवान जखमी झाले आहेत. या भागात अद्यापही चकमक सुरू आहे.

<><><><><>

भारतातून अमेरिकेत चोरुन नेलेल्या मौल्यवान कलात्मक वस्तू, प्राचीन मुर्ती, पूरातन आणि पारंपरिक वस्तूं संदर्भात भारत आणि अमेरिकेत एक करार करण्यात आला आहे. या करारानुसार दोन्ही देशातल्या अवैध व्यापार, निर्यात आयात आणि पूरातत्व वस्तूंच्या तस्करीवर नियंत्रण आणण्यात येणार आहे. भारताचा अमेरिकेबरोबर करण्यात आलेला अशा प्रकारचा हा पहिलाच करार आहे.

आज नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांशी बोलतांना केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांनी ही माहिती दिली. हा करार ऐतिहासिक असल्याचं ते यावेळी म्हणाले.

<><><><><>

जम्मू आणि काश्मीरमध्ये वर्ष २०२५ अखेरपर्यंत शासकीय आणि निवासी अशा सुमारे ४० हजार इमारतींवर सौर ऊर्जेचे अनेक प्रकल्प उभारण्याचं उद्दिष्ट सरकारनं ठेवलं आहे. यामुळे डिसेंबर २०२५ पर्यंत जम्मू आणि काश्मीरमध्ये अतिरिक्त २७० मेगावॅट सौर ऊर्जेची निर्मिती होणार आहे. या माध्यमातून २० हजार

घरगुती आणि किमान २२ हजार ४९४ शासकीय इमारतींचा यात समावेश होणार आहे. जम्मू आणि काश्मीर ऊर्जा विकास संस्था प्राथमिक स्तरावर याची अंमलबजावणी करणार आहे. या धर्तीवर वर्ष २०३० अखेरपर्यंत ५०० मेगावॅट तर वर्ष २०४७ अखेरपर्यंत १५०० मेगावॅट सौर ऊर्जेच्या निर्मितीचं उद्दिष्ट ठेवलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेच्या उपाध्यक्ष कमला हॅरिस यांनी अध्यक्षपदाच्या ५ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी काल रात्री आपली उमेदवारी अधिकृतरीत्या जाहीर केली. यासाठी आवश्यक असणारे अर्ज त्यांनी काल जमा केले. प्रत्येक मत मिळवण्यासाठी आपण कष्ट करू, असं सांगून निवडणुकीत विजयी होण्याचा विश्वास त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे व्यक्त केला. विद्यमान अध्यक्ष जो बायडन यांनी या निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर कमला हॅरिस यांच्या नावाची शिफारस केली होती. माजी अध्यक्ष बराक ओबामा आणि माजी फर्स्ट लेडी मिशेल ओबामा यांनीही नुकताच कमला हॅरिस यांच्या नावाला पाठिंबा दिला.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा येत्या २९ तारखेचा मुंबई दौरा काही अपरिहार्य कारणामुळे पुढे ढकलला आहे. महाराष्ट्र विधानपरिषद शतक महोत्सवानिमित्त राष्ट्रपतींच्या हस्ते येत्या २९ तारखेला वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्त्व या ग्रंथाचं प्रकाशन, तसंच महाराष्ट्र विधीमंडळातल्या सदस्यांना उत्कृष्ट संसदपटू आणि उत्कृष्ट भाषण पुरस्कार दिले जाणार होते. मात्र त्यांचा दौरा पुढे ढकलल्यामुळे हा कार्यक्रमही पुढे ढकलला असल्याचं महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयानं कळवलं आहे.

**<><><><><>**

**महाराष्ट्रात** नवी मुंबईच्या सेक्टर १९ मधल्या शाहबाज गावातली एक तीन मजली इमारत आज पहाटे कोसळून यात दोघांचा मृत्यू झाला आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या दोघांना अग्निशमन दलाच्या जवानांनी बाहेर काढलं असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मदत आणि बचावकार्य सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या घटनेबद्दल नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलाश शिंदे यांच्याशी चर्चा केली आणि दुर्घटनाग्रस्त लोकांना तातडीनं आवश्यक मदत देण्याची सूचना केली. या घटनेतल्या दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश नवी मुंबई महापालिका आयुक्त आणि पोलिस आयुक्तांना देण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमांद्वारे दिली आहे.

दरम्यान, **कोल्हापूरमध्ये** उद्भवलेल्या पूरसदृश परिस्थितीचाही आढावा शिंदे यांनी घेतला. मदत आणि बचाव कार्यासाठी एनडीआरएफ आणि एसडीआरएफची पथकं तैनात करावीत, गरज भासल्यास भारतीय लष्करालाही पाचारण करावं, असे निर्देश त्यांनी दिले. **आलमट्टी धरणातून पाण्याचा विसर्ग करण्याबाबत कर्नाटक सरकारशी समन्वय साधून काम करावं, असंही शिंदे यांनी सांगितलं.**

हवामान विभागानं आज **मुंबईला** यलो अलर्ट, तर रा**यगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, चंद्रपूर आणि गोंदिया** या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरमधल्या भगवती नगर यात्री निवास इथल्या बेसकॅम्पमधून आज एक हजार ७७१ यात्रेकरू अमरनाथ गुहेकडे रवाना झाले. यात्रेकरूंना घेऊन जाणारी ६३ वाहनं पहाटे पवित्र गुफेच्या दिशेनं रवाना झाली. यातले ७७२ यात्रेकरू बाल्ताल मार्गाने तर ९९९ यात्रेकरू पहलगाम मार्गानं पुढचा प्रवास करतील.

**<><><><>**

मुसळधार पाऊस असतानाही पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेचा उद्घाटन सोहळा काल मोठ्या दिमाखात पार पडला. देशोदेशीच्या खेळाडूंच्या पथकांनी मैदानात नेहेमीच्या प्रथेपेक्षा वेगळ्या पद्धतीनं संचलन केलं. जवळपास सात हजार खेळाडूंनी पॅरिसमधल्या सीन नदीतून बोटीतून येऊन उपस्थितांना अभिवादन केलं. ज्युदोमध्ये तीन वेळा विजेता ठरलेला टेडी  रायनर यानं ऑलिम्पिक ज्योत प्रज्वलित केली. भारताच्या पथकाचं नेतृत्व पीव्ही सिंधू आणि शरत कमल यानी केलं.

आजपासून स्पर्धांना सुरुवात होत असून जगभरातील सात हजार खेळाडू यामध्ये सहभागी झाले आहेत. पुरुष एकेरी रोइंग, १० मीटर एअर रायफल मिश्र दुहेरी, १० मीटर एअर पिस्तूल पुरुष आणि महिला एकेरी स्पर्धा, टेनिसमध्ये पुरुष दुहेरी स्पर्धा, बॅडमिंटन क्रीडा प्रकारात पुरुष एकेरी, पुरुष दुहेरी, महिला दुहेरी गटात, तर टेबल टेनिस क्रीडा प्रकारात पुरुष एकेरी गटात, पुरुष हॉकी आणि महिलांच्या बॉक्सिंग क्रीडा प्रकारात भारतीय खेळाडू आज आपलं क्रीडा कौशल्य आजमावतील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरील संदेशाद्वारे भारतीय पथकातल्या खेळाडूंना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><>**

क्रिकेटमध्ये भारत आणि श्रीलंके दरम्यानच्या तीन सामन्यांच्या टी ट्वेंटी मालिकेतला पहिला सामना आज होणार आहे.

**<><><><>**

**मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, मध्य प्रदेश, हरयाणा, छत्तीसगड, विदर्भ, कोकण, कर्नाटकाचा दक्षिण** भाग आणि **गोव्यात** आज जोरदार पाऊस होईल, असा अंदाज भारतीय हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

येत्या दोन दिवसांत **सौराष्ट्र, कच्छ आणि गुजरातच्या** काही भागासह **उत्तराखंड, राजस्थान, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, केरळ, माहे, जम्मू काश्मीर, लडाख आणि गिलगिट** इथंही जोरदार पावसाची शक्यता आहे. याकाळात, आसाम आणि त्रिपुरा मध्ये वातावरण उष्ण आणि दमट राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**